“महात्मा ज्योतिराव फुलेप्रणीत सत्यशोधक चळवळीची क्रांतिकारकता आणि प्रासंगिकता: एक चिकित्सक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,
मानव विज्ञान शाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील
पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा

संशोधन आराखडा
(Research Synopsis)

संशोधक विद्यार्थिनी
सौ. मंगला हुल्लाजी नामपल्ले
एम.ए. (राज्यशास्त्र) बी.एड.

संशोधन मार्गदर्शक
प्रा.डॉ.आर.बी.लक्षटे
प्राध्यापक व विभागप्रमुख
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग
देगलूर महाविद्यालय देगलूर, ता. देगलूर जि. नांदेड

“महात्मा ज्योतिराव फुलेप्रणीत सत्यशोधक चळवळीची क्रांतिकारकता आणि प्रासंगिकता: एक चिकित्सक अभ्यास”

१) विषय प्रवेश (Introduction)

महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास “फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र” असे म्हणतात. त्यापैकी ज्योतिराव गोविंदराव फुले (११ एप्रिल १८२७ - २८ नोव्हेंबर १८९०) हे महात्मा फुले नावाने लोकप्रिय, महाराष्ट्रातील एक सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, जातिविरोधी समाजसुधारक आणि लेखक होते. सामाजिक प्रबोधन, अस्पृश्यता व जातिव्यवस्थेचे निर्मूलन, आणि स्त्रियांना व मागास जातीच्या लोकांना शिक्षण देण्याचे कार्य त्यांनी कार्य केले.

बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. महात्मा फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले हे दोघे भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते आहेत. जोतिरावांनी १८४८ मध्ये पुण्यात तात्यासाहेब भिडे यांच्या भिडेवाडा येथे मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातींमधील लोकांना समान हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी आपल्या अनुयायांसह सत्यशोधक समाजाची स्थापना केली. शोषित वर्गाच्या उत्थानासाठी कार्य करणाऱ्या या समाजात सर्व धर्म आणि जातीचे लोक सहभागी झाले. महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून फुले यांची ओळख आहे. त्यांना १८८८ मध्ये महाराष्ट्रीय सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलराव कृष्णाजी वांदेकर यांनी “महात्मा” ही सन्मानाची पदवी प्रदान केली होती.

सत्यशोधक चळवळीची स्थापना करणारे ज्योतिराव फुले हे समाजसुधारक, विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांचा जन्म महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील कटगुण येथे सन १८२७ मध्ये झाला. त्यांचे शिक्षण ख्रिस्ती मिशनरींनी स्थापन केलेल्या शाळेत झाले. ज्योतिराव फुले हे सामाजिकदृष्ट्या बहिष्कृत असलेल्या समाजातील होते. ते 'सत्यशोधक समाजाचे' संस्थापक होते. त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची अर्थात सत्यशोधक चळवळीचा प्राथमिक भर हा सत्याचा शोध घेण्यावर होता. सत्यशोधक समाजाने जातीय समतेचा प्रचार केला. 'सत्यशोधक चळवळ' ही कनिष्ट समजल्या गेलेल्या जातीतील लोकांचे सामाजिक न्याय आणि मानवी हक्क सुरक्षित करण्यासाठी समर्पित होती. महात्मा फुले यांनी लिंगभेद आणि जातिभेदाविरुद्ध काम केले. त्यांनी भारतीय जातीयतेवर आधारित समाजावर टीका केली. ज्योतिराव फुले यांनी अस्पृश्य आणि स्त्रियांच्या उत्थानासाठी कार्य केले, हे दोन गट चातुर्वर्ण्य व्यवस्थेत सर्वात नीच मानले गेले.

बालपणापासूनच भारतातील जातीप्रदान समाजात असलेल्या अन्यायांबद्दल त्यांच्या स्वतःच्या कल्पना विकसित होऊ गेल्या. ब्राह्मणांच्या श्रेष्ठत्वाच्या दाव्यांवर ज्योतिराव फुले यांनी टीका केली होती. आर्य हे भारतात आलेले परदेशी होते, असे प्रतिपादन ज्योतिराव फुले यांनी केले. त्यांनी असा युक्तिवाद केला की आर्यांनी भारतातील खऱ्या मूलनिवासीयांना वश करून त्यांचा पराभव केला. आर्यांच्या आगमनानंतर शोषित व गुलाम झालेले मूलनिवासी आर्यांच्या आगमनापूर्वीही संपन्न अवस्थेत येथे राहत होते, असे त्यांचे म्हणणे आहे. ज्योतिराव फुले यांनी असे मत मांडले की आर्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित करताना पराभूत लोकांना नीच जातीचे आणि शुद्र व अतिशूद्र ठरवले.

ज्योतिराव फुले यांच्या म्हणण्याप्रमाणे तथाकथित नीच जातीचे लोक जे मूळनिवासी होते, त्यांचा जमिनीवर अधिकार होता. ज्योतिराव फुले यांच्या मते,

"उच्च" जातींना सत्ता आणि जमिनीवर अधिकार नव्हते. ज्योतिराव फुले यांनी जाती-आधारित भेदभावाला आव्हान देण्यासाठी अतिशूद्र (अस्पृश्य) आणि शूद्र (कामगार जाती) यांच्या एकतेचा प्रस्ताव मांडला. ज्योतिराव फुलेंच्या मते आर्यांच्या आगमनापूर्वीचा काळ सुवर्णकाळ असून या काळातील वैभवाचे स्मरण केले पाहिजे.

१८७३ मध्ये फुले यांनी 'गुलामगिरी' नावाचे पुस्तक लिहिले. तेंव्हा १० वर्षांपूर्वी अमेरिकन गृहयुद्धानंतर अमेरिकेत गुलामगिरी संपली होती. ज्योतिराव फुले यांनी गुलामगिरी मुक्त करण्यासाठी लढलेल्या सर्व अमेरिकन लोकांना 'गुलामगिरी' हा ग्रंथ समर्पित केली होता. त्यामुळे अमेरिकेचे काळे गुलाम आणि भारतातील तथाकथित निच जातीतील लोक यांच्यात दुवा निर्माण झाला होता.

मराठी लेखकांच्या परिषदेला लिहिलेल्या पत्रात, ज्योतिराव फुले यांनी असा युक्तिवाद केला आहे की उच्च जातीच्या लोकांनी स्थापन केलेल्या परिषदा आणि विविध संघटना ब्रिटिश सरकारमध्ये काम करत असताना त्यांनी आधुनिकतावादी असल्याचे भासवत. हे लोक निवृत्त झाले आणि त्यांना पेन्शन मिळाल्यावर ते भेदभाव करत. डॉ. बी. आर. आंबेडकर आणि ई.व्ही. रामास्वामी नायकर यांनी विसाव्या शतकात जातसुधारणा चळवळ पुढे नेली. महात्मा ज्योतिराव फुले यांचे जवळपास १५ उल्लेखनीय प्रकाशित ग्रंथ आहेत. या त्यांच्या ग्रंथात त्यांनी उच्चवर्णीय महिलांविरुद्ध होणारा भेदभाव आणि कामगारांच्या दुःखाविरुद्धही लढा दिला. सर्व प्रकारच्या असमानतेविरुद्ध त्यांनी युक्तिवाद केला हे यावरून दिसून येते.

शिक्षण फक्त विशेषाधिकारप्राप्त लोकांनाच मिळायला हवे, अशी काही लोकांची भूमिका होती. समाजाची प्रगती करायची असेल तर स्त्रियांना शिक्षित केले पाहिजे, असे मत काही सुधारकांनी मांडले. पुण्यात महिलांसाठी पहिली शाळा ज्योतिराव फुले यांनी उघडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा फुले यांना आपले गुरु मानले आहे. महात्मा फुले नावाचा भारतीय मराठी भाषेतील चरित्रात्मक चित्रपट आहे. हा सिनेमा

१९५४ मध्ये प्रदर्शित झाला होता. हा सिनेमा ज्योतिराव फुले यांच्यावर होता. महात्मा फुलेंच्या नावाने पुतळे, शैक्षणिक संस्था, संग्रहालये, मोठ्या बाजारपेठा आहेत.

१८४८ मध्ये ज्योतिरावांना जातीभेदाच्या सामाजिक अन्यायाविरुद्ध लढण्यास प्रवृत्त करणाऱ्या एका घटनेमुळे भारतीय समाजात सामाजिक क्रांतीची सुरुवात झाली, असे प्रतिपादन करता येईल. ज्योतिरावांना त्यांच्या एका मित्राच्या लग्नाचे आमंत्रण मिळाले, जो उच्च जातीच्या ब्राह्मण कुटुंबातील होता. पण जेंव्हा वधूच्या कुटुंबाला ज्योतिबाच्या कुळाबद्दल कळले तेव्हा त्यांनी लग्नात त्यांचा अपमान केला आणि छळ केला. महात्मा ज्योतिरावांना समारंभातून त्यांना धक्के मारून बाहेर काढले गेले. या प्रसंगामुळे त्यांनी विद्यमान जातिव्यवस्था आणि सामाजिक बंधनांना विरोध करण्याचा निर्धार केला होता. त्यांनी आपल्या जीवनाचे ध्येय बनवले आणि या सामाजिक अन्यायाने प्रभावित झालेल्या सर्व लोकांच्या मुक्तीसाठी कार्य केले. थॉमस पेन यांचे सुप्रसिद्ध पुस्तक “द राइट्स ऑफ मॅन” वाचल्यानंतर त्यातील समजुतींचा जोतिरावांवर मोठा प्रभाव पडला. त्यांचा असा विचार बनला की, सामाजिक समस्यांवर मात करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे महिला आणि कनिष्ठ समजल्या गेलेल्या जातीतील लोकांना शिक्षित करणे हा होय.

सत्यशोधक चळवळ

ज्योतिराव फुले यांनी १४ सप्टेंबर, १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समानतेला चालना देणाऱ्या विचारांची पुनर्बांधणी करण्यापूर्वी त्यांनी ऐतिहासिक कल्पना आणि श्रद्धा यांचे पद्धतशीर विश्लेषण केले. ब्राह्मणी धर्माचे प्राचीन पवित्र ग्रंथ, वेद यांचा ज्योतिरावांनी कठोरपणे निषेध केला. ब्राह्मणवादाची उत्पत्ती शोधण्यासाठी त्यांनी इतर अनेक प्राचीन लेखनाचा अभ्यास केला. त्यांनी ब्राह्मणांवर समाजातील ‘शूद्र’ आणि ‘अतिशुद्र’ यांना दडपून त्यांचे सामाजिक वर्चस्व टिकवण्यासाठी क्रूर आणि शोषणात्मक नियम तयार केल्याचा आरोप केला.

सत्यशोधक समाजाचे ध्येय समाजाला जातीय पूर्वग्रहापासून मुक्त करणे आणि कनिष्ठ मानलेल्या वंचित जातीतील लोकांना ब्राह्मणांनी लावलेल्या कलंकातून मुक्त करणे हे होते.

'दलित' हा शब्द सुरुवातीला ज्योतिराव फुले यांनी ब्राह्मण ज्यांना कनिष्ठ जातीतील आणि अस्पृश्य मानतात अशा प्रत्येकासाठी वापरला होता. सत्यशोधक समाजात सामिल होण्याकरीता विशिष्ट जाती किंवा वर्गाचे बंधन नव्हते. १८७६ पर्यंत, 'सत्यशोधक समाजा'चे ३१६ सदस्य होते. ज्योतिरावांनी १८६८ मध्ये त्यांच्या घराबाहेर एक सार्वजनिक आंघोळीची टाकी बांधण्याचा निर्णय घेतला जेणेकरून सर्व लोकांप्रती त्यांची सहिष्णुवृत्ती आणि जातीभेदाची पर्वा न करता कोणाहीसोबत सहभोजनाची त्यांची इच्छा दिसून येई.

तत्कालीन समाजातील जातिभेद, अनिष्ट प्रथा, तसेच समाजातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी याविरुद्धची प्रतिक्रिया महात्मा फुले यांच्या साहित्यातून उमटलेली होती. त्याकाळातील समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखविण्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीमध्ये महात्मा फुले यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. त्यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी असल्याचे सर्वमान्य आहे.

'कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे' असे रोखठोकपणे बोलताना मात्र या विश्वाची निर्मिती करणारी कोणती तरी शक्ती आहे, अशा आशयाची त्यांची मांडणी होती. मानवाने गुण्यागोविंदाने रहावे असे त्यांचे मत होते. ज्योतिराव यांच्या तत्त्वचिंतनात 'नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे.' महात्मा फुलेंनी सामाजिक प्रबोधन करण्यासाठी 'शेतकऱ्यांचा आसूड' यासह अनेक ग्रंथ लिहून सामाजिक प्रबोधन केले. मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावरून विश्वकुटुंब कसे निर्माण होईल? आणि त्याकरिता कशा

प्रकारचा वर्तनक्रम व वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे? हे ज्योतिराव फुलेंनी आपल्या ' सार्वजनिक सत्यधर्म ' संहितेत अनेक महत्त्वाच्या वचनांच्या आधारे मांडली आहे.

समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. तेच सत्यशोधक समाज सोसायटीचे ते पहिले अध्यक्ष आणि खजिनदार होते. वेदांना झुगारून त्यांनी जातीयभेद आणि चातुर्वर्णीय भेदभावास विरोध करण्यास सुरुवात केली.

महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली तेंव्हा स्त्री विभागाचे नेतृत्व सावित्रीबाई यांनी केले. सावित्रीबाई यांच्याबरोबर १९ महिला सत्यशोधक समाजाचे कार्य करीत होत्या. त्याचवेळी सावित्रीबाई ह्या एका कन्याशाळेच्या शिक्षिकाही होत्या. दीनबंधू प्रकाशनाने सत्यशोधक चळवळीच्यावेळी लेखन-प्रकाशनाचे काम केले. महाराष्ट्रातील तळागाळापर्यंत चळवळ पोहचली. छत्रपती शाहू महाराजांनी सत्यशोधक चळवळीस पाठिंबा दिला. अन्यायापासून, अत्याचारांपासून व गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना मानवी हक्काची जाणीव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सर्वसाक्षी जगत्पती । त्याला नकोच मध्यस्ती ॥ हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली आणि मराठी भाषेत मंगलाष्टके रचली.

महात्मा फुले यांच्या निधनानंतर सत्यशोधक चळवळ महाराष्ट्रात रुजवण्यासाठी दिनकरराव जवळकर व केशवराव जेधे यांनी खूप मेहनत घेतली. राजर्षी शाहू महाराजांनी त्यांना समाजप्रबोधनासाठी मदत केली. या जेधे-जवळकर जोडीने ब्राह्मणेतर चळवळीसाठी केलेल्या कार्यामुळे अवघा महाराष्ट्र ढवळून निघाला .

जमीनदार, शेटजी व पुरोहितांकडून होणाऱ्या अन्याय, अत्याचारापासून , गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना हक्काची जाणीव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 'निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक । भांडणे अनेक कशासाठी ॥' हा विचार फुले यांनी मांडला. देवाविषयी किंवा निसर्गाविषयी निर्मिक हा शब्द वापरला, त्यावरून सत्यशोधक समाज व अर्थातच महात्मा ज्योतिराव फुले हे आस्तिक होते, हे स्पष्ट होते. महात्मा फुले यांनी कनिष्ठ वर्गातील लोकांसाठी गुलामगिरी हा उपदेशपर ग्रंथ लिहून झाल्यानंतर महाराष्ट्रात पंतोजी व शेटजींच्या मानसिक गुलामगिरीतून कनिष्ठ वर्गाला मुक्त करण्यासाठी चळवळ सुरू करण्याचा निर्धार केला.

ज्योतिराव फुले हे क्रांतिकारी नेते असल्याने त्यांच्या वृत्तीशी सुसंगत व धोरणाला पोषक असे तत्त्वज्ञान व विचारपीठ निर्माण करणे त्यांना अत्यंत गरजेची वाटले यातूनच सत्यशोधक समाजाची निर्मिती झाली. एकेश्वरवाद, ईश्वर भक्ती, व्यक्तीचे श्रेष्ठत्व, त्याचप्रमाणे ग्रंथप्रामाण्य त्याला विरोध, सत्य हेच परम, मानवी सद्‌गुणांची जोपासना, अशाप्रकारची वैचारिक आणि प्राथमिक भूमिका घेऊन सत्यशोधक समाजाने आपले तत्त्वज्ञान मांडले. ईश्वराची भक्ती ही निरपेक्ष भावनेने असावी त्यामध्ये मध्यस्थाची अथवा भटब्राह्मणाची आवश्यकता नाही, याचं प्रतिपादन सत्यशोधक समाजाने केलं. त्याचप्रमाणे व्यक्ती ही जन्माने श्रेष्ठ नसून ती गुणकर्माने श्रेष्ठ ठरते. याचं स्पष्टीकरणही सत्यशोधक समाजाने दिले. पाप-पुण्य, स्वर्ग-नरक, पुनर्जन्म या गोष्टीला त्यांनी थारा दिला नाही. तर सत्य हेच परब्रह्म आहे, अशा प्रकारचा विचार सत्यशोधक समाजाने मांडला. मानवाच्या अंगी असलेल्या सद्‌गुणांची जोपासना व्हावी हा विचार ठाम करण्याचा प्रयत्न सत्यशोधक समाजाने केला.

'सार्वजनिक सत्यधर्म' हा सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथामध्ये महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या विचारांचे प्रतिपादन केले आहे. मानवता धर्माची शिकवण सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न केला गेला. सामाजिक परिवर्तनाची दिशा ठरवताना सत्यशोधक समाजाने समाजातील दीनदलित, उपेक्षीत समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न केला. सत्यशोधक समाजातर्फे 'दीनबंधू' नावाचे एक साप्ताहिक मुखपत्र म्हणून चालविले जात असे. या वृत्तपत्राचे संपादक 'कृष्णराव भालेराव हे होते. त्यांनी इ.स. १ जानेवारी १८७७ मध्ये पुणे येथे स्थापन केले होते. हे वृत्तपत्र मराठी भाषेत होते. लोकशिक्षण व लोकजागृतीचे प्रभावी माध्यम म्हणून दिनबंधुचा उल्लेख करावा लागतो .

समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सत्यशोधक समाजाचे मुंबई शाखेचे अध्यक्ष नारायण मेघाजी लोखंडे हे होते. इ.स १८९० मध्ये यांनी दिनबंधु या वृत्तपत्राचे संपादन आणि मुद्रण मुंबई येथून केले.

कमीअधिक प्रमाणात सत्यशोधक चळवळ झपाटयाने, काही वेळा मंदपणे फोफावत असली, तरी सत्यशोधक समाजाच्या वतीने तिच्या ध्येय-उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठीच चळवळीचे हे महायान सुरू होते. लोकजागरण, लोकप्रबोधन, लोकसंघटन आणि नवसमाजनिर्मिती या सत्यशोधक समाजाच्या ध्येयसिद्धीसाठी हा सारा खटाटोप व प्रयास होता. महात्मा फुले यांनी स्थापना केलेल्या सत्यशोधक समाजाच्या अधिवेशनांची सुरुवात इ.स. १९११ पासून झाली. १९११ पासून २००७ पर्यंत सत्यशोधक समाजाची एकूण ३५ अधिवेशने संपन्न झाली. पहिले अधिवेशन १७ एप्रिल १९११ रोजी पुणे येथे स्वामी रामय्या व्यंकय्या अय्यावरू यांच्या अध्यक्षतेने पार पडले.

त्याच्या स्वागताध्यक्षपदी गणपतराव बिरमल होते. ३५ वे अधिवेशन २२ डिसेंबर २००७ रोजी मराठवाडयातील गेवराई, जिल्हा बीड येथे डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

सत्यशोधक समाजाच्या कार्यासाठी महात्मा फुले यांनी घटना बनविली. त्या अनुषंगाने नियमावली तयार केली. मूलतः सत्यशोधक समाज एकच निर्मिक, एक धर्म, एक मनुष्यजात मानणारा म्हणून स्थापन झाला. त्याची आचारसंहिता सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथात दिली असून, त्यात ढोबळ नियम सांगितले आहेत. त्यानुसार समाजाच्या कार्यकारिणीत सुरुवातीस महात्मा ज्योतिराव फुले हे चिटणीस आणि डॉ. विश्राम रामजी घोले हे अध्यक्ष होते. वर्षातून कार्यकारिणीच्या सर्वसाधारण चार सभा, लोकशाही पद्धतीने कार्यकारी मंडळाची निवड व बहुमताने निर्णय, अशी सर्वसाधारण सूत्रे होती. सुरुवातीस दर रविवारी डॉ. गावडे यांच्याकडे अनौपचारिकरीत्या मंडळी जमत. समाजापुढील प्रश्न, ते प्रश्न सोडवणुकीचे उपाय व सदयःस्थिती यांविषयी चर्चा होत असे आणि दर पंधरा दिवसांतून एक व्याख्यान असा उपक्रम असे.

सत्यशोधक समाजातील व्यक्तींनी पुढील काही सूत्रे काटेकोरपणे पाळावीत, अशी भूमिका आहे. (१) ईश्वर (निर्मिक) एक असून तो सर्वव्यापी, निर्गुण, निर्विकार व सत्यरूप आहे आणि सर्व माणसे त्याची लेकरे आहेत. या निर्मिकाशिवाय (निर्मात्याशिवाय) मी इतर कशाचीही पूजा करणार नाही. (२) निर्मिकाची भक्ती करण्याचा पूर्ण अधिकार प्रत्येकाला आहे. त्यासाठी पुरोहित किंवा मध्यस्थाची आवश्यकता नाही. (३) माणूस जातीने श्रेष्ठ ठरत नसून गुणांनी श्रेष्ठ ठरतो. (४) निर्मिक सावयव रूपाने अवतरत नाही. (५) पुनर्जन्म, परलोक, मोक्ष, कर्मकांड, जपतप या गोष्टी अज्ञानमूलक आहेत. त्यांचा अवलंब माझ्याकडून होणार नाही. (६) जनावरांना मारण्यात मी सहभागी होणार नाही. (७) दारूच्या व्यसनापासून अलिप्त

राहण्याचा मी प्रयत्न करीन आणि (८) तसेच समाजाचा खर्च चालावा म्हणून मी माझ्या उत्पन्नातून काही वर्गणी देईन. हा संदर्भ मराठी विश्वकोशात सापडतो.

महात्मा ज्योतिराव फुले यांची सत्यशोधक चळवळ ही मुंबई व चेन्नई प्रांतात सुरू झालेली ही ब्राह्मणेत्तर चळवळ १९१७ ते १९३७ या कालखंडात पुढे नेण्याचे मोठे काम दिनकरराव जवळकर यांनी केले. ते हवेली तालुक्यातील म्हातोबाची आळंदी या गावचे शेतकरी होते. त्यांच्या शेतीचा शेवटचा तुकडा सन १९२५ सालीच गुजर सावकाराच्या घशात गेला. छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना 'कैवारी' नावाचे वृत्तपत्र काढून दिले. ते त्याचे संपादकही होते. ब्राह्मणेतर चळवळीचे ते महाराष्टातील धडाडीचे नेते होते. पुण्यात त्यांनी व केशवराव जेधे यांनी छत्रपती मेळे काढून लोकमान्य टिळक यांना विरोध केला होता. लोकमान्य टिळक व कृष्णाशास्त्री चिपळूणकर हे देशाचे दुश्मन आहेत असे ते म्हणत. टिळक हे तेल्यातांबोळ्यांचे नाहीत तर ते सनातनी ब्राह्मणाचे पुढारी होते. बहुजन समाजाची भटांनी पिळवणूक केली. त्यामुळे समाज मागे राहिला. अशी त्यांची मते होती.

वैचारिक साहित्य म्हणून उल्लेखनीय बाब अशी की, त्यांनी इ.स.१९२५ साली 'देशाचे दुश्मन' नावाचे पुस्तक लिहिले. देशाचे दुश्मन नावाच्या पुस्तकाबद्दल ल.ब. भोपटकर वकील यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे फिर्याद केली. प्रकाशक केशवराव जेधे आणि प्रस्तावना-लेखक बागडे वकील या तिघांना ताबडतोब पकड वॉरंटाने कैद करून त्यांची येरवडा जेलमध्ये झटपट रवानगीही झाली. तिघाही आरोपींना शिक्षा झाल्या. त्यावर अपील झाले. अपील चालवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर धावून आले. त्यांनी आरोपींची बाजू लढवली आणि तिघाजणांची निर्दोष सुटका केली. सत्यशोधक दिनकरराव जवळकर पत्रकारिता पुरस्कार दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य

परिषदेच्यावतीने खानवडी येथे होणाऱ्या महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलनात दिला जातो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक महत्त्वपूर्ण खटल्यात सहभाग घेतला होता. ब्राह्मणेत्तर सत्यशोधक चळवळीशी संबंधित नेते केशव गणेश बागडे, केशवराव मारुतीराव जेधे, रांमचंद्र. केशव सीताराम ठाकरे यांचे महात्मा फुले हे आदर्श होते. महात्मा फुलेंच्या क्रांतिकारी साहित्याचा अभ्यास केल्यानंतर समाजसुधारणांबाबतच्या त्यांच्या संकल्पना अधिक स्पष्ट होत गेल्या. श्रीराम गुंदेकर त्यांनी 'सत्यशोधकी साहित्याचा इतिहास' लेखनाचा चार खंडांचा बृहद लेखनप्रकल्प सुरू केला आणि तो पूर्णत्वास नेला. त्यामुळे संशोधकास महात्मा ज्योतिराव फुलेप्रणीत सत्यशोधक चळवळीची क्रांतिकारकता आणि प्रासंगिकता यांचे चिकित्सक अध्ययन करणे अत्यंत महत्वाचे व उपयुक्त वाटते. तेंव्हा **'महात्मा ज्योतिराव फुलेप्रणीत सत्यशोधक चळवळीची क्रांतिकारकता आणि प्रासंगिकता: एक चिकित्सक अभ्यास'** या शीर्षकाधिन प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले आहे.

२. समस्यासूत्रण (Research Problem) :

संशोधक हा स्वत: त्याला पडलेल्या विविध प्रश्नांची उकल संशोधन पद्धतींच्या चौकटीत राहून करत असतो. मग तो संशोधक नैसर्गिक शास्त्रांचा असो की मानव विज्ञान शास्त्राचा. मानव विज्ञानशाखेत अनेक विषय आहेत त्यापैकी राज्यशास्त्र हा एक महत्वपूर्ण विषय आहे. ज्यात राज्य, शासन व मानवाच्या राजकीय वर्तवणुकीचा अभ्यास केला जातो. राज्य, शासन, सत्ता, याबाबत विचार मांडणारे विचारवंत व समाजसुधारक यांचा अभ्यासही यात होतो. राज्यशास्त्र विषयाच्या या अभ्यासविषयाशी संबंधित राज्य, शासन, सत्ता, मानवाच्या सामाजिक व राजकीय वर्तनाबाबत आपल्या अनेक ग्रंथातुन विचार मांडणारे महात्मा ज्योतिराव फुले व त्यांनी स्थापन केलेल्या

सत्यशोधक चळवळीची तत्कालात व वर्तमानात क्रांतिकारकता कशी होती? त्या क्रांतिकारकतेची आजच्या समाजाला गरज आहे का? सत्यशोधक चळवळीची क्रांतिकारकता आज प्रासंगिक आहे का? सत्यशोधक चळवळीची तत्वे आजच्या सामाजिक चळवळीसाठी मार्गदर्शक ठरतील का? अशाप्रकारच्या फुलेंच्या सत्यशोधक चळवळीचे सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक संदर्भ जाणुन घेणे येथे संशोधकास क्रमप्राप्त वाटते. तसेच फुलेंचा विचार व कृती महिला सक्षमीकरणाची आहे. हा विचार वाचून व त्यावर संशोधनात्मक कार्य करून मला व माझ्यासह अनेक महिलांना विचार सांगुन माझे व त्यांचे जीवन सक्षम करण्याइतपत प्रस्तुतता आज या विचारात मला वाटते म्हणून या सर्व प्रश्नांची उत्तरे जाणुन घेण्याकरीता मी संशोधनासाठी **'महात्मा ज्योतिराव फुलेप्रणीत सत्यशोधक चळवळीची क्रांतिकारकता आणि प्रासंगिकता: एक चिकित्सक अभ्यास'** हा विषय निवडला.

३. संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Research) :

कोणत्याही प्रश्नांचा अभ्यास करीत असताना अभ्यासकाला काही उद्दिष्टे निश्चित करावी लागतात. म्हणून प्रस्तुत अभ्यासाची खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करणे.
२. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीची वैचारिकता अभ्यासणे.
३. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीची क्रांतिकारकता तपासणे.
४. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीची सद्यस्थितीत प्रासंगिकता आहे की नाही? यांचा शोध घेणे.

५. सत्यशोधक चळवळीच्या यश-अपयशाच्या कारणाचा अभ्यास करणे.
६. महात्मा ज्योतिराव फुले यांची सत्यशोधक चळवळ आजच्या सामाजिक चळवळीस व या सामाजिक चळवळीचे नेते व कार्यकर्त्यासयांचे कितपत मार्गदर्शक आहे? ते तपासणे.

४. संशोधनाची गृहितके (Hypotheses of the Research) :

१. महात्मा ज्योतिराव फुले यांचे जीवनचरित्र प्रेरणादायी आहे.
२. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीची वैचारिकता ही सामाजिक, क्रांतीकारी, आधुनिकतावादी आणि परिवर्तनवादी स्वरुपाची आहे.
३. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीची क्रांतीकारकता अहिंसक व लोकशाही स्वरुपाची आहे.
४. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीची प्रासंगिकता त्रिकालाबाधित आहे.
५. सत्यशोधक चळवळ ही आधुनिकतावादाचे प्रतिक आहे.
६. सत्यशोधक चळवळ ही आधुनिक युगातील सामाजिक चळवळीस मार्गदर्शकाचे कार्य करते.

५. पूर्व संशोधनाचा आढावा (Review of the Literature):

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीवरील पूर्व संशोधनाचा आढावा घेणे या ठिकाणी क्रमप्राप्त ठरते. महेश जोशी यांनी ‘सत्यशोधक समाजाचा इतिहास’ या नावाने चार खंड प्रकाशित केले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यानी ते प्रकाशित केलेले आहेत. त्यामुळे सत्यशोधक चळवळीवर भरीव प्रकाश पडतो. तसेच याच प्रकाशनाद्वारे ‘महात्मा फुले समग्र

वाड्.मय’ प्रकाशित केले. याचे संपादक य. दि. फडके आहेत. त्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी तो एक महत्वपूर्ण दस्तावेज़ आहे. प्रा. डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी ‘सत्यशोधकी साहित्याचा इतिहास’ यावरील चार खंड प्रकशित कलेले आहेत. प्रा. हरी नरके यांनी ‘महात्मा ज्योतिराव फुले पर्यायी समाजव्यवस्थेचे शिल्पकार’ या आपल्या ग्रंथात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विचारातील पर्यायी समाजव्यवस्थेची मांडणी केलेली आहे. तसेच महात्मा ज्योतिराव फुले यांच्याशी संबंधित अनेक अंगाने संशोधन झालेले आहे, पण महात्मा ज्योतिराव फुलेप्रणीत सत्यशोधक चळवळीची क्रांतिकारकता आणि प्रासंगिकता समजुन घेण्याच्या दृष्टीने संशोधनात्मक कार्य झाले नसल्यामुळे मी संशोधनासाठी **‘महात्मा ज्योतिराव फुलेप्रणीत सत्यशोधक चळवळीची क्रांतिकारकता आणि प्रासंगिकता: एक चिकित्सक अभ्यास’** हा विषय निवडला आहे.

६. संशोधनातील अतंर (Gap of the Research):

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीविषयी पूर्व संशोधनाचा आढावा घेतल्यानंतर संशोधनातील अंतर तपासणे याठिकाणी प्रस्तुत ठरते. या चळवळीचा दिड शतकाचा (१८७३-२०२३) कालखंड पूर्ण झालेला आहे. महेश जोशी यांचे ‘सत्यशोधक समाजाचा इतिहास’. ‘महात्मा फुले समग्र वाड्.मय’, संपादक य. दि. फडके, प्रा. डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे ‘सत्यशोधकी साहित्याचा इतिहास’, यासारख्या अनेक ग्रंथांमधून सत्यशोधक चळवळीवर भरीव प्रकाश पडतो परंतु महात्मा ज्योतिराव फुलेप्रणीत सत्यशोधक चळवळीची क्रांतिकारकता आणि प्रासंगिकता यावर प्रर्याप्त संशोधन झाले नाही. हे संशोधनातील अंतर आहे. म्हणुन प्रस्तुत अभ्यासासाठी **‘महात्मा ज्योतिराव फुलेप्रणीत सत्यशोधक चळवळीची क्रांतिकारकता आणि प्रासंगिकता: एक चिकित्सक अभ्यास’** हा विषय निवडणे क्रमप्राप्त वाटले.

७. संशोधनाची उपयुक्तता (Utility of the Research) :

कोणतेही संशोधन हे व्यावहारिक अथवा सैद्धांतिक दृष्टीने उपयुक्त असणे आवश्यक असते. त्या अनुषंगाने या संशोधनाची उपयुक्तता प्रामुख्याने पुढीलप्रमाणे सादर करण्यात येते.

१) सामाजिक उपयुक्तता

महात्मा ज्योतिराव फुलेप्रणीत सत्यशोधक चळवळ ही आधुनिक सामाजिक मुल्यांवर आधारित सामाजाची पुनर्रचना करणारी असल्यामुळे वर्तमान भारतीय समाजाच्या जडणघडणीस उपयुक्त असा आशय संदर्भ प्रस्तुत संशोधनातून प्राप्त होणार आहे. सत्यशोधक चळवळ ही समतेवर आधारित अहिंसक सामाजिक क्रांतीसाठी प्रेरणादायी असल्यामुळे जातीय भेदभाव व विषमतावादी मानसिकता नाहीसी करण्याकरीता प्रस्तुत चळवळीची क्रांतिकारकता आणि प्रासंगिकता समजुन घेण्यास उपयुक्त असल्याचे दिसून येते.

२) नीति निर्धारणासाठी उपयुक्तता

प्रस्तुत संशोधनामुळे शिक्षण, महिला सक्षमीकरण, शोषणनिर्मूलन, वंचितांच्या मानवीअधिकारांचे संरक्षण व संवर्धन, सामाजिक न्याय, सामाजिक कल्याण अशा अनेक बाबींवर धोरण ठरवताना प्रेरणा व मार्गदर्शन मिळेल. जातीय भेदभाव दूर करणे. सामाजिक व आर्थिक विषमता कमी करणारे धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता नीतिनिर्धारक, शासन, नेते यांना एक निश्चित दृष्टिकोण प्राप्त होईल असे प्रतिपादन करता येईल.

३) सैद्धांतीक उपयुक्तता

महात्मा ज्योतिराव फुलेप्रणीत सत्यशोधक चळवळीला आधुनिक सामाजिक चळवळीचा आधारस्तंभ म्हणून पहिले जाते. स्वातंत्र्य, समानता, बंधुभाव व सामाजिक

न्याय या आधुनिक मूल्य व सिद्धांताची प्रेरणा, दृष्टिकोन, आणि पार्श्वभूमी प्रस्तुत चळवळीत सापडते. मानवी मुल्ये, सामाजिक समानता, शोषणमुक्त समाज अशा सैद्धांतिक दृष्टिकोनातून सत्यशोधक चळवळीची प्रासंगिकता अधोरेखित होताना दिसून येते.

८. संशोधन पद्धती (Research Methods):

'महात्मा ज्योतिराव फुलेप्रणीत सत्यशोधक चळवळीची क्रांतिकारकता आणि प्रासंगिकता: एक चिकित्सक अभ्यास' अशी संशोधन समस्या निश्चित करण्यात आलेली आहे. प्रस्तुत संशोधन मानव विज्ञान शाखेअंतर्गत येत असल्याने सामाजिक संशोधनासाठी वापरण्यात येणाऱ्या ऐतिहासिक (Historical Method), वर्णनात्मक (Descriptive Method), आणि विश्लेषणात्मक (Analytical Method) या संशोधन पद्धतीचा वापर यात करण्यात आलेला आहे. तसेच या संशोधनात कारण-परिणामाचे सूत्र (Cause and Effect) अनुषंगिकरुपाने परिलक्षित होणार आहे.

९. तथ्य संकलन (Collection of Data):

प्रस्तुत संशोधनाच्या तथ्य संकलनासाठी महात्मा ज्योतिराव फुलेंचे संकलित वाङ्मय, त्यांनी स्वत: लिहिलेले ग्रंथ, दीनबंधु या वर्तमानपत्रातून प्रकाशित केलेले लेख, आत्मचरित्र, दैनंदिन पत्रे, महात्मा फुले यांच्या विचाराबाबत शासनाने प्रकाशीत केलेले ग्रंथ, त्यांच्या विचारांच्या समर्थनात्मक आणि टीकात्मक भाष्य करणारे ग्रंथ, अनुवादित ग्रंथ, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, नियतकालिके, मासिके, त्रैमासिके, महात्मा फुलेंच्या विचारासंबंधी पीएच.डी. चे शोधप्रबंध, सत्यशोधक चळवळीविषयी वेगवेगळ्या संकेतस्थळांवर उपलब्ध असलेली माहिती, इत्यादी संसाधनांचा आधार घेवून अभ्यास करण्यात येईल.

१०. प्रकरण योजना (Chapter Scheme) :

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात विषय प्रवेश, वैचारिक अभिधारणा, यांचे संक्षिप्त अध्ययन करण्यात येईल. तसेच, साहित्याचे पुनर्विलोकन, संशोधन समस्या, विषय निवडीचीमागची भूमिका, संशोधनाची गृहितके, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधन पद्धती, तथ्य संकलन व त्यांचे स्रोत, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधनाचे महत्त्व, प्रकरण योजना आणि संदर्भ यांचे थोडक्यात विवेचन करण्यात आले.

प्रकरण दुसरे: महात्मा ज्योतिराव फुले यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण

प्रस्तुत प्रकरणात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या व्यक्तिमत्वाची जी जडण-घडण झाली, याचे अध्ययन करण्यात आले. फुलेंचे बालपण, बालमनावरील संस्कार, अवांतर वाचन, व्यक्तिमत्वास आकार, जीवनाला निर्णायक वळण, त्यांचा स्वाभिमान, अन्यायाची चीड, पाश्चात्य तत्वचिंतन, फुले विचारांची जडण-घडण यांचा अभ्यास करणे.

प्रकरण तिसरे : सत्यशोधक चळवळीची पार्श्वभूमी व तत्वज्ञान

प्रस्तुत प्रकरणात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीची पार्श्वभूमी यांचे अध्ययन करण्यात आले. ध्येय व प्रेरणा, धार्मिक वातावरणाचा प्रभाव, चळवळीची विचारधारा व त्यास सार्वजनिक जीवनात मिळालेली मान्यता इत्यादी.

प्रकरण चौथे : सत्यशोधक चळवळीची क्रांतिकारकता

प्रस्तुत प्रकरणात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीची क्रांतिकारकता यांचे अध्ययन करण्यात येईल. अमानवी विषमता, बहुजन लोकांना ब्राह्मणवादी व्यवस्थेकडून दिली जाणारी जातीभेदाची वागणूक, स्वत: ला सहन करावा लागलेला अपमान, या विरुद्ध लेखन, प्रबोधन आणि परिवर्तन या माध्यमातून दिलेला लढा इत्यादी.

प्रकरण पाचवे : सत्यशोधक चळवळीची प्रासंगिकता

प्रस्तुत प्रकरणात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीची प्रासंगिकता यांचे अध्ययन करण्यात येईल. भारतीय राजकारणावर पडलेला प्रभाव, जागतिक नेतृत्वावर पडलेला प्रभाव, इतर देशातील सामजिक चळवळी, स्वातंत्र्य चळवळी, लोकांच्या राजकीय, सामाजिक जीवनावर झालेला परिणाम, आणि त्यांची प्रासंगिकता याचे अध्ययन करण्यात येईल.

प्रकरण सहावे : समारोप, निष्कर्ष व शिफारशी

प्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणामध्ये संशोधन कार्याचा समारोप करण्यात येईल. शेवटी संदर्भसूची जोड़ण्यात येईल आणि अभ्यासातून निष्पन्न झालेले निष्कर्ष व शिफारशी मांडण्यात येणार आहेत.

संशोधन कालावधी दरम्यान उपलब्ध होणाऱ्या संशोधन सामग्रीनुसार वरील संशोधन आराखड्यात बदल होऊ शकतो.

११. संदर्भग्रंथ

- Uwe Flick, (2017), An Introduction to Qualitative Research, New Delhi, Sage Publications India Pvt. Ltd.
- Kumar Ranjit, (2014), Research Methodology: A Step-by-Step Guide for Beginners, New Delhi, Sage Publications India Pvt. Ltd.
- Malik-Goure, (2013), Jyotiba Phule: A Modern Indian Philosopher, New Delhi, D.K. Printworld Pvt. Ltd.
- Deshpande G.P. (Edt.), (2021), Selected Writings of Jyotirao Phule, LeftWord Dooks, New Delhi.
- Bhardwaj Pawan, (2019), The Legend of Jyotiba Phule, Delhi, Punit Books.
- मेश्राम एल.जी. (अनु.संपा),(२०१८) महात्मा ज्योतिबा फुले-रचनावली १, दिल्ली, राधाकृष्ण प्रकाशन प्रायवेट लि.
- चव्हाण गजानन (अनु.), (२०२३), ज्योतिबा फुले व्यक्तित्व और विचार, नई दिल्ली, सामयिक प्रकाशन
- नरके हरी, (संपा), (१९९१), महात्मा फुले गौरव ग्रंथ, खंड १, मुंबई, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मंत्रालय.
- जोशी महेश, (१९८७), सत्यशोधक समाजाचा इतिहास प्रस्तावना खंड, मुबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती आणि मंडळ.
- गुंदेकर श्रीराम, (२०१०), सत्यशोधकी साहित्याचा इतिहास खंड १, लातूर, सत्यशोधकी साहित्य प्रकाशन.
- फडके य. दि., (संपा), (१९९१), महात्मा फुले समग्र वाङ्मय, मुबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती आणि मंडळ.
- उगले जी.ए., (२०२२), सत्यशोधक चळवळीचा समग्र इतिहास, मुबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती आणि मंडळ.

- कीर धनंजय (संपा), (२००२), महात्मा फुले समग्र वाङ्मय, मुबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती आणि मंडळ.
- कांडगे, राम (मार्च २००४). महात्मा जोतीराव फुले व्यक्ती व कार्य, चाकण, राजश्री प्रकाशन.
- कीर, धनंजय (२०२०). महात्मा जोतीराव फुले, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन.
- कालवणे, केदार (सप्टेंबर २०२०). लौकिक जीवनमार्गाचे वैश्विक तत्वज्ञान, पुणे, अक्षर वाड्.मय.
- लोकराज्य (जून २०२२) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुबई.
- कुंभार नागोराव (संपा), (२०२४), विचारशलाका, लातूर.
- कुंभार नागोराव (संपा), (२०१८), समकालीन सामाजिक चळवळी, पुणे, डायमंड प्रकाशन.

संशोधन मार्गदर्शक
प्रा.डॉ.आर.बी.लक्षटे
प्राध्यापक व विभागप्रमुख
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग
देगलूर महाविद्यालय देगलूर.
ता. देगलूर जि. नांदेड

संशोधक विद्यार्थिनी
सौ. मंगला हुल्लाजी नामपल्ले
एम.ए. (राज्यशास्त्र) बी.एड.
शिवबानगर देगलूर